दि. 01.06.2025

# प्रेसनोट

## 'अवैध व्यवसाय विरोधी अभियान -१'

## मे महिन्यात दीड हजार कारवाया, 7 कोटीहून अधिक रकमेचा मुद्येमाल जप्त ...

परिक्षेत्रात सुरू असलेल्या अवैध दारू, मटका, जुगार, ऑनलाइन लॉटरी, क्रिकेट बॅटिंग, गुटखा, अंमली पदार्थ, वेश्याव्यवसाय, वाळू उपसा व वाहतूक, अवैध प्रवासी वाहतूक इत्यादींना आळा घालण्याकामी व्यापक मोहिमेची आवश्यकता लक्षात घेऊन, दिनांक १ मे पासून म्हणजे महाराष्ट्र दिनापासून परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांत '**अवैध व्यवसाय विरोधी अभियान**-1' चे आयोजन करण्यात आले होते.

सदर मोहिमेत, पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी, अंमलदार यांचेसह सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी व अपर पोलीस अधीक्षक हे सहभागी झाले आहेत. त्याचप्रमाणे, स्थानिक गुन्हे शाखा व विशेष पोलीस पथके ही देखील कारवाईत सहभागी झाली असुन, संबंधित जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक यांनी अवैध व्यवसाय विरोधी कारवायांवर वैयक्तिक देखरेख ठेवली होती.

सदर मोहिमेदरम्यान माहे मे- 2025 मध्ये नांदेड परिक्षेत्रात अवैध व्यावसायिकांविरुध्द (1561) गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. दि.01.05.2025 ते दि.31.05.2025 पावेतो नांदेड परिक्षेत्रातील नांदेड, परभणी, हिंगोली व लातूर या चारही जिल्हयांत अवैध व्यवसायांविरोधात गुटखा, दारुबंदी , मटका/ जुगार, गांजा, अवैध दारु , वाळू व इतर संबधाने खालील प्रमाणे कारवाया करण्यात आल्या आहेत.

| **घटक** | **गुटखा केसेस** | जप्त मुद्येमाल | **दारुबंदी केसेस** | जप्त मुद्येमाल | **मटका-जुगार केसेस** | जप्त मुद्येमाल | **इतर केसेस** | जप्त मुद्येमाल | **एकूण केसेस** | **जप्त मुद्येमाल** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नांदेड | -- | -- | 227 | 19,70,590 | 102 | 8,96,035 | 42 | 2,79,21,365 | 371 | 3,078,7,990 |
| परभणी | 1 | 37,720 | 249 | 8,43,855 | 96 | 5,77,667 | 31 | 2,02,52,072 | 376 | 2,16,73,594 |
| हिंगोली | 10 | 12,720 | 236 | 10,27,358 | 92 | 1,89,462 | 72 | 61,17,100 | 403 | 7,33,3,920 |
| लातूर | -- | -- | 319 | 21,24,950 | 54 | 5,89,890 | 27 | 1,53,86,261 | 400 | 1,81,01101 |
| **एकूण** | 11 | 50,440 | 1031 | 59,66,753 | 344 | 22,53,054 | 175 | 6,96,76,798 | 1561 | 7,78,96,605 |

जून महिन्यात अवैध व्यवसायाविरोधी अभियान-2 राबविणार : गत मे महिन्यात अवैध व्यवसायांचे विरोधात करण्यात आलेली कारवाई जून महिन्यात आणखी व्यापक करण्यात येत आहे. परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांचा बिमोड करण्यासाठी जून महिन्यात '**अवैध व्यवसाय विरोधी अभियान**-2' राबविण्यात येत आहे. सदर मोहिमेदरम्यान अचानकपणे राबविण्यात येणाऱ्या किमान (4) मासरेडचा समावेश असुन, गुटखा बंदीसाठी व्यापक वाहन व साठवणूक ठिकाणांच्या तपासणीची मोहिम हाती घेण्यात येणार आहे. या मोहिमेदरम्यान अवैध व्यवसाय चालविणाऱ्या इसमांविरुध्द हद्यपार , MPDA व मोक्का कायदयाखाली कारवाई करण्यासाठी अभिलेखांची पडताळणी करण्यात येत आहे.

आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती, नागरिकांनी नजीकच्या पोलीस ठाण्यास अथवा पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाच्या **nandedrange.mahapolice.gov.in** या संकेतस्थळावर कळवून अशा अवैध व्यवसायांचा बिमोड करण्यासाठी आपला हातभार लावावा, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी केले आहे.

कार्यालय पोलीस उप महानिरीक्षक,
नांदेड परिक्षेत्र, नांदेड.